# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४ था मजला,४९,खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू. क्र. .: ०२२-६२५४२१००/१७०

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा. क्र. मरातंशिमं/का-५०/फार्मसी_S Scheme_अतिरिक्त संधी/२०२४/ 5231 दिनांक – 22 AUG 2024

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,

**प्राचार्य,**

**मंडळाशी संलग्नित औषधनिर्माण शास्त्र पदविका**

**अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्था**

विषयः औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमातील Educational Regulations ER-91 नुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना “S”Scheme नुसार अभ्यासक्रम पूर्ण करणेबाबत व परीक्षा देणेबाबत...

संदर्भः मंडळाचे परीपत्रक क्र. मरातंशिमं/का-५०/S Scheme to J Scheme/२०२१-२२/१५७४, दि. ०३/०३/२०२२

औषधनिर्माण शास्त्र पदविका अभ्यासक्रमातील Educational Regulations ER-91 नुसार प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता मंडळाद्वारे “S” Scheme राबविण्यात आली होती व ER-2020 Regulations साठी “J” Scheme उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या दि. ०९/१०/२०२० रोजीच्या राजपत्र अधिसूचना प्रकरण ४ मधील कलम २२ अंतर्गत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने मंडळाच्या परीक्षा नियमावलीतील RG-18 मधील तरतुदीनुसार ER-91 Regulations व “S” Scheme मधील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शेवटच्या नियमित (Regular) परीक्षेपासून पुढील सलग ४ परीक्षेमध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होण्याकरीता संधी देण्यात आली होती. त्याबाबतचे सविस्तर विवरण संदर्भीय परीपत्रकाद्वारे सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात आले होते.

सदर परीपत्रकानुसार ER-91 अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना PH1S अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होण्याकरीता उन्हाळी-२०२३ पर्यंत संधी देण्यात आली होती. तसेच PH2S अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होण्याकरीता उन्हाळी-२०२४ पर्यंत संधी देण्यात आली होती.

तरी विद्यार्थी हितास्तव औषधनिर्माण शास्त्र पदविका PH1S व PH2S अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्याकरीता अतिरिक्त संधी देण्यात येत आहे. त्याबाबतचे सविस्तर विवरण पुढीलप्रमाणे आहे –

१) औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष (PH1S) “S” Scheme प्रवेशित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याकरीता पुढील ०३ परीक्षेमध्ये अतिरिक्त संधी देण्यात येत आहे म्हणजे अ) हिवाळी परीक्षा-२०२४, ब) उन्हाळी परीक्षा-२०२५, क) हिवाळी परीक्षा-२०२५. तदनंतर प्रथम वर्षातील “S” Scheme (PH1S) ची कोणतीही परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येणार नाही.

२) औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील द्वितीय वर्ष (PH2S) “S” Scheme प्रवेशित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याकरीता पुढील ०४ परीक्षेमध्ये अतिरिक्त संधी देण्यात येत आहे म्हणजे अ) हिवाळी परीक्षा-२०२४, ब) उन्हाळी परीक्षा-२०२५, क) हिवाळी परीक्षा-२०२५ व ड) उन्हाळी परीक्षा-२०२६. तदनंतर द्वितीय वर्षातील “S” Scheme (PH2S) ची कोणतीही परीक्षा मंडळामार्फत घेण्यात येणार नाही.

३) औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील जे विद्यार्थी PH1S मध्ये उत्तीर्ण असतील किंवा प्रथम वर्षातील निकालानुसार द्वितीय वर्ष प्रवेशासाठी (PH2S) पात्र असतील, अशा विद्यार्थ्यांना संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये द्वितीय वर्षात प्रवेश द्यावा. तसेच उन्हाळी परीक्षा-२०२५ निकालानुसार द्वितीय वर्षासाठी (PH2S) पात्र असतील, अशा विद्यार्थ्यांना संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये द्वितीय वर्षात प्रवेश द्यावा. सदर विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम मंडळाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार आयोजित करून “S” Scheme नुसार PH2S चे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

४) **ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय वर्षाचे सत्र ER-91 Regulations व "S" Scheme नुसार पूर्ण केले असून प्रथम व द्वितीय वर्षातील विषयात अनुत्तीर्ण आहेत, अशा विद्यार्थ्यांनी उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ मध्ये नमूद मुदतीत परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा PCI च्या निर्देशानुसार असे विद्यार्थी ER-91 नुसार औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी गमावतील.**

तरी संस्थाप्रमुखांनी या परीपत्रकातील महत्त्वाच्या सूचना संबंधित विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या निदर्शनास आणून त्याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे. याबाबत काटेकोरपणे कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थांची राहील.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१

प्रतः

१) मा. संचालक, म. रा.तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई यांना माहिती करीता
२) उपसचिव, म. रा.तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर,छत्रपती संभाजी नगर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता
३) उपसचिव, का. क्र. ४० व ४२ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता